# पोलीस स्टेशन वाडा,

E-mail wadapstn@gmail.com


Reference No.:- 611 /2023 Date 27/ 07/ 2023

१) खुनाच्या गुन्हयात ०२ महीन्यापासुन पाहीजे असणारा परळी येथील विकास वाघ यास वाडा पोलीसांकडुन अटक

२) वाडा पोलीस ठाण्यात सन २०१९ मधील व सन २०२२ मधील गुन्हयात पाहीजे असलेल्या इतर ०२ आरोपीतांना वाडा पोलीस ठाण्याकडुन अटक

वाडा पोलीस ठाणे हद्दीतील परळी दिवेपाडा येथील युसुफी फार्म हाऊसमध्ये श्रीमती इंदुरा ऊर्फ संगीता ढवळु धिंडा वय ५५ वर्ष, रा.परळी, ता.वाडा, जि.पालघर व तिची मानलेली आई श्रीमती लक्ष्मी दत्तु दिवे वय ७६ वर्ष, रा.परळी, ता.वाडा, जि.पालघर मजुरी व देखभालीचे काम करीत असतात व तेथेच राहत असतात. त्याच गावात राहणारा विकास ऊर्फ खंडऱ्या विलास वाघ याची सदर फार्म हाऊस परिसरात अधुन ये जा चालु असल्यमुळे तसचे विकास वाघ याची गुन्हेगारी पार्श्वभुमी असल्यामुळे त्य त्याला नेहमी हटकत असत व त्यातुन त्यांचे वाद होत असत अशा वादातुन विकास वाघ याने संबंधित महीला यांना बघुन घेण्याची धमकी सुध्दा दिली होती. दिनांक ३०/०५/२०२३ रोजी रात्रौ यातील मयत इंदुरा ऊर्फ संगीता ढवळु धिंडा या एकटयाच फार्म हाऊसमध्ये झोपलेल्या असतांना रात्रौ ११:०० ते दिनांक ३१/०५/२०२३ रोजी पहाटे ०४:०० वाजताचे सुमारांस आरोपीत इसम याने झोपलेल्या ठिकाणाहुन ओढत नेवुन चेहऱ्यावर दगडाने टेचुन जागेवरच खून केलेला आहे. याबाबत दिनांक ३१/०५/२०२३ रोजी वाडा पोलीस स्टेशन येथे लक्ष्मी दिवे हीने विकास वाघ याचे विरुध्द दिलेल्या फिर्यादीवरुन गु.रजि.नं.२०३/२०२३ भा.दं.वि.क.३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सदरचा गुन्हा दाखल झाल्यापासुन यातील पाहीजे आरोपी विकास ऊर्फ खंडऱ्या विलास वाघ हा पळुन गेलेला होता. याबाबत गोपनिय बातमीदारामार्फत प्राप्त माहीतीच्या आधारे तसेच तांत्रीक गोष्टीचे विश्लेषण करुन यातील पाहीजे असणारा आरोपी विकास ऊर्फ खंडऱ्या विलास वाघ यास वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक हाके, पोहवा मढवी, पोशि सोनावणे, जाधव, हरेश काळे यांच्या पथकाने मोहंडुळ ता.भिवंडी जि.ठाणे येथुन शेतातुन ताब्यात घेवुन नमुद गुन्हयात रितसर अटक करण्यात आलेली आले अटक आरोपीतास मा.न्यायालयात हजर केले असता दिनांक ३१/०७/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोनि सुरेश कदम हे करीत आहेत.

तसेच वाडा पा.स्टे.गु.रजि.नं.२८१/२०१९ भा.दं.वि.क.३२४ मधिल पाहीजे असणारा आरोपी दिलीप केशव राजकवर,रा.बोरांडे पलाटपाडा, ता.वाडा, जि.पालघर हा सुध्दा सदरचा गुन्हा दाखल झाले पासुन नजरेआड होता त्यास गोपनिय बातीमदारामार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे शोध घेवुन अटक करण्यात आलेली आहे. तसेच वाडा पो.स्टे.गु.रजि.नं.२०७/२०२२ भा.दं.वि.क.३२४ या गुन्हयामधील पाहीजे असणारी महिला आरोपी सुगंधा शिवराम जाधव रा.चिखले ता.वाडा ही सुध्दा गुन्हा दाखल झाल्यापासुन नजरेआड होती तिचा सुध्दा बातमीदारामार्फत माहीती घेवुन शोध घेवुन नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. सदरची कारवाई सपोनि खरमाटे, मपोहवा भोये, पोशि खिलारे यांचे पथकाने केलेली आहे.

सदरची सर्व कार्यवाई पोलीस अधीक्षक, पालघर श्री.बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक, पालघर श्री.पंकज शिरसाट, श्री.शैलेश काळे, उप विभागीय पोलीस अधिकारी जव्हार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.सुरेश कदम पोलीस निरीक्षक यांनी व त्यांच्या पथकानी केलेली आहे.